**महाराष्ट्र शासन**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि. रायगड.**
**जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड, अलिबाग. जि.रायगड**

Email- deangmcalibag@gmail.com Phone No.02141-29921 www.gmchalibag.in/gmch

जा .क्र.शावैमअ/दरपत्रक/ औषधसामुग्री/ ३६/२०२६ दि. ०६ /०१/२०२६

## दरपत्रक मागणी पत्र.

प्रति,

---------------------

---------------------

---------------------

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय ,अलिबाग-रायगड सलंग्नित जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांना लागणारे अत्यावश्यक औषधसामग्रीची खरेदी करीता दरपत्रके मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत..

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड सलंग्नित जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग-रायगड यांना विविध रोगासाठी लागणारी अत्यावश्यक औषधसामग्रीची खरेदी करणे आत्यावश्यक आहे. त्या अनुषंगाने खालील नमुन्यात **दोन मोहरबंद लिफाफे पद्धतीने** विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| | Particulars | Quantity | Unit Price |
|---|---|---|---|
| 1. | Inj. Anti Rabies Vaccine 1 ml | 1 | Including all taxes |
| 2. | Inj. Antirabies Serum 2ml | 1 | |

अ.नं.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा, दि. १४/०१/२०२६ रोजी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारत घेतले जाणार नाही / ग्राहय धरले जाणार नाही.

२. प्रथम तांत्रिक मोहोरबंद लिफाफ्यामध्ये खरेदी प्रक्रियेस आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे व मानक प्रमाणपत्रे सादर करण्यात यावी व त्या लिफाफ्यावर तांत्रिक लिफाफा असे नमुद करण्यात यावे. व दुसऱ्या आर्थिक मोहरबंद लिफाफ्यामध्ये फक्त उक्त बांबीचे दर करांसहीत सादर करण्यात यावी व त्या लिफाफ्यावर आर्थिक दरपत्रक लिफाफा असे नमुद करण्यात यावे. आणि सदर दोन्ही मोहोरबंद लिफाफे मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग.जि. रायगड यांचे नावे विहित मुदतीत या कार्यालयास सादर करावेत. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफयांवर औषधसामग्री करीता दरपत्रक लिहुन सादर करावे.

३. संस्थास्तरावरील औषधी,सर्जिकल आणि तदअनुषंगीक बाबींची दरपत्रके,निविदा व स्थानिक खरेदी करतांना पुरवठादार / उत्पादक यांनी खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक राहील. (संदर्भ :- **१) मा. सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन व संशोधन, मुंबई यांचे परिपत्रक क्र. सवैविसं/औखक/परिपत्रक/१५७७८/२०२४.दिनांक १८ डिसेंबर, २०२४.**

**२) मा. अवर सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन पत्र क्रं. विपसु-१२२४/प्र.क्र.४६५/प्रशा-२, दिनांक २०/१२/२०२४.)**

i) Valid WHO GMP Certificate and WHO GMP Product list or COPP for quoted Items.
ii) In House test report for purchased item.
iii) National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories (NABL test report). Compulsory.
iv) Non conviction certificate issued from concern FDA for Manufacturer/Distributor.
v) For Consumables: ISO 13485 (International Organisation for Standardisation), 150 17025,150 45001, ISO 14001, GMP (Good Manufacturing Practices)/Schedule M, Quality Management System (QMS) for Medical Devices, Central Drugs Standard Control Organisation (CDSCO) approved MD License.

४. उपरोक्त अनु. क्र ३ मधील मानक प्रमाणपत्रे व कागदपत्रे तसेच पुढील व्यावसायिक कागदपत्रे तांत्रिक माहोरबंद लिफाफयात सादर कराण्यात यावी.

१) दुकानाचा परवाना, २) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, (Drug Licence) ३)जी.एस.टी.क्रमांक पत्र.४) पॅनकार्ड क्रमांक.

५. सादर करण्यात येणाऱ्या दोन्ही लिफाफयांवर डाव्या बाजूस दरपत्रक क्र, लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

६. दरपत्रक ग्राहय कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांका पासुन सहा (०६) महिन्यांचा राहील.

७. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रक आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

८. सदर औषधसामग्रीची किंमत, सर्व करांसहीत एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

९. तांत्रिक बाबींमध्ये पात्र ठरणाऱ्या ज्या दरपत्रकदारकाचे आर्थिक बाबीकरीता दर हे न्यूनतम असतील अशा यशस्वी दरपत्रकदारकास आवश्यकते नुसार औषधसामग्री चा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

१०. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.

११. काम पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयके अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत. (With Revenue Stamp)

१२. देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क अदा केले जाणार नाही.

१३. वरील नमूद औषधसामग्रीची नग संख्या ही मा. अधिष्ठाता यांच्या आदेशान्वये /प्रशासकीय उपलब्धतेनुसार कमी किंवा वाढवली जाऊ शकते.

१४. पुरवठादारकाचे पूर्ण नाव, भ्रमणध्वनी आणि संपूर्ण पत्ता, सांकेतांक क्र.(Email address along with Website) हा Envelope वर नमूद असणे आवश्यक आहे.

**अधिष्ठाता,**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग रायगड

प्रत - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलकावर दरपत्रक मागविण्या संदर्भात दिनांक :- **०६/०१/२०२६** सुचना देण्यात आल्या आहेत.